

# अंब्रेला ऑर्गनायजेशनबाबत काही अपेक्षा

**प्रमोद कर्नाड**
अध्यक्ष (BOM)
शरद सहकारी बँक लि., पुणे

नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन NUCFDC ह्या नागरी सहकारी बँकांच्या अंब्रेला ऑर्गनायझेशनचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री मा. श्री. अमितभाई शाह यांचे हस्ते दि. ०२ मार्च, २०२४ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे समारंभपूर्वक झाले.

सुमारे १५/१६ वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर NUCFDC ची स्थापना होऊ शकली व नागरी सहकारी बँकांसाठी अशी अंब्रेला संस्था रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने येऊ शकली याचा मा. सहकार मंत्री यांनी आनंद व्यक्त केला. त्याचबरोबर मा. केंद्रीय मंत्री असेही म्हणाले की, विविध सहकारी संस्थांमध्ये परस्परांत सहकार्य असल्याशिवाय व या संस्थांना थोडे पाठबळ मिळाल्याशिवाय सहकारिता अधिक सुदृढ होऊ शकणार नाही. यापूर्वी केंद्रीय सहकार विभागाचे काम कृषी मंत्रालयासह वेगवेगळ्या केंद्रीय खात्यात विखुरले गेले होते. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी केंद्रामध्ये स्वतंत्र सहकार मंत्रीपद निर्माण करुन सहकारी चळवळीस हातभार लावलेला आहे. जेणेकरुन सहकारी चळवळ ही जनसामान्यांची चळवळ म्हणून पुढे यावी अशी अपेक्षा मा. श्री. अमितभाई शाह यांनी व्यक्त केली. या NUCFDC नामक शिखर संस्थेच्या स्थापनेमुळे नागरी सहकारी बँकांच्या विकासात भर पडणार आहे. विशेषत: लहान नागरी सहकारी बँकांना बँकिंग रेग्युलेशन ॲक्टची व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करण्यास अंब्रेला ऑर्गनायजेशनचे नक्कीच सहाय्य होणार आहे, असेही केंद्रीय सहकार मंत्री त्यावेळी म्हणाले.

देशातील सुमारे १५०० नागरी सहकारी बँकांच्या एकूण ११००० शाखा व एकूण रु. ५ लाख कोटी इतक्या ठेवी आणि एकूण रु. ३.५० लाख कोटींची कर्जे ही सहकारी बँकांची आज ताकद आहे व ही एकत्रितपणे नागरी सहकारी बँकांच्या चळवळीसाठी विनियोगित व्हावी आणि त्यासाठी अंब्रेला ऑर्गनायजेशन उपयुक्त ठरेल तसेच NUCFDC या शिखर संस्थेच्या स्थापनेनंतर पुढच्या ३ वर्षात आपले स्थान बळकट करुन लहान नागरी सहकारी बँकांना सुरक्षितता दिल्यास बँकांच्या ठेवीदारांचा विश्वास आणखी वाढेल, असा विश्वास केंद्रीय सहकार/गृहमंत्री यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

**पार्श्वभूमी :-**

नागरी सहकारी बँकांना त्यांचे मर्यादित भाग भांडवल, मर्यादित कार्यक्षेत्र व कर्ज वाटपाचे क्षेत्र तसेच अकुशल कर्मचारी व इतर अन्य कमतरतेच्या बाबींमुळे आर्थिक आव्हानांना तोंड द्यावे लागत असते. यासंदर्भात कायमस्वरुपी तोडगा काढावा यासाठी व नागरी सहकारी बँकांना आर्थिक संपन्न करण्यासाठी अंब्रेला ऑर्गनायजेशनची संकल्पना मांडण्यात आली. जगात अनेक देशांमध्ये अशी शिखर

संस्थेची संकल्पना असून याप्रकारच्या संस्था बँकांना तरलता व भांडवल सहाय्य करतात. तसेच माहिती तंत्र




ज्ञानाबाबतच्या पायाभूत सुविधा कमी दरात उपलब्ध करुन देतात.

रिझर्व्ह बँकेने गठीत केलेल्या सन २००६ सालच्या विश्वनाथन कमिटीने आणि तद्नंतरच्या व्ही. एस. दास यांच्या वर्कींग ग्रुपने २००९ साली आपला अहवाल देऊन अशाप्रकारची अंब्रेला ऑर्गनायजेशन भारतात असावी याचा विचार मांडला होता व त्यास पुढे महत्त्वपूर्ण अशा मालेगम कमिटी व गांधी कमिटी या रिझर्व्ह बँक नियुक्त अभ्यास गटांद्वारे देखील शिफारसी करण्यात आल्या. असे असले तरी ही संस्था स्थापन होण्याची गती धीमी होती व अखेर दि. ०२ मार्च २०२४ रोजी ही शिखर संस्था खऱ्या अर्थाने रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने निर्माण झाली. यामध्ये 'नॅफकब' चा वाटा देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. या संस्थेस भविष्यात एकूण रु. ३०० कोटीपर्यंतचे भाग भांडवल उभे करणेचे असून तूर्तास रु. १०० कोटीची मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे मुळातच ही संस्था भक्कम स्वनिधीच्या पायावर उभी राहणार असून देशातील सर्व नागरी सहकारी बँकांचा यामध्ये भाग (Share) रुपाने सहभाग अपेक्षित आहे.

NUCFDC ही शिखर संस्था नागरी सहकारी बँकांकडून निधी स्वीकारेल, कर्ज रुपाने निधी उभारेल व बाजारातून वित्त संस्थांकडून निधी उभारेल आणि त्याचा विनियोग रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेप्रमाणे केला जाणार आहे. या शिखर संस्थेकडून नागरी सहकारी बँकांना विविध प्रकारच्या सेवा, वित्तीय सहाय्यता, सल्ला मसलती, प्रशिक्षण दिले जाणार असून नागरी सहकारी बँकांची व्यावसायिकता व कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नागरी सहकारी बँकांना त्यांचे भाग भांडवल वाढविणेकामी मदत करणे, तरलतेसाठी (लिक्विडिटीसाठी) सहाय्य करणे, सर्वात महत्त्वाचे म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचे व्यासपीठ व पायाभूत सुविधा कमी दरात उपलब्ध करुन त्यांचा यावरील खर्च कमी करणे आणि अद्ययावत बँकिंग सुविधा नव्या तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध करण्यास सहाय्य करणे, नॉन फंड बेस्ड सेवा व्यावसायिक क्षेत्रात प्रशिक्षण व सल्ल्याद्वारे देऊन नागरी सहकारी बँकांना व सहकारी चळवळीस पुष्टी देणे इ. NUCFDC ची उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे पूर्ण करण्यात ही संस्था सफल झाली तरच तिच्या निर्मितीमध्ये अर्थ आहे. अन्यथा या संस्थेची उद्दिष्टे फक्त कागदावरच राहतील व शंभरपेक्षा जास्त वर्षे जुन्या असलेल्या सहकार चळवळीस इतर संस्था याप्रमाणे आणखी एक NUCFDC नावाची संस्था डोक्यावर आणून बसविल्यासारखे होईल!

**नागरी सहकारी बँकांच्या NUCFDC या शिखर संस्थेकडून अपेक्षा :-**

NUCFDC कडून नागरी सहकारी बँकांच्या अनेक अपेक्षा आहेत. गेली १५/१६ वर्षे प्रयत्न करुन बराच गाजावाजा करुन ही शिखर संस्था माहे मार्च, २०२४ मध्ये एकदाची अस्तित्त्वात आली आहे. दि कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी व सहकार क्षेत्रातील तज्ञ श्री. अतुल खिरवाडकर यांची या शिखर संस्थेवर पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. ते विविध बँकिंग कॉन्फरन्सेसमध्ये वक्ते म्हणून जात असलेने अनेक नागरी सहकारी बँकांची 'दुखणी' त्यांना माहिती आहेत. नॅफकबचे माजी अध्यक्ष व सहकारातील नामवंत

व्यक्तिमत्त्व श्री. ज्योतिंद्रभाई मेहता यांची आता या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे ही देखील गौरवाची बाब आहे. दिल्लीस्थित या शिखर संस्थेने नागरी सहकारी बँकांनी स्वत:कडे येण्याची वाट न पाहता स्वत:कडे असलेल्या माहितीच्या आधारे छोट्या-मोठ्या नागरी सहकारी बँकांना प्रत्यक्ष मदत करण्यास विनाविलंब सुरुवात करणे अपेक्षित आहे.

अनेक बँकांना एएसपी मॉड्युल/क्लाऊड टेक्नोलॉजीच्या माध्यमातून आपले आय.टी. विषयक खर्च कमी करावयाचे आहेत. ट्रेझरी विभागात गव्हर्नमेंट सिक्युरिटी खरेदी विक्री व ट्रेडिंग व्यवहारात निष्णात व्हायचे आहे आणि व्यावसायिक नफा कमवावयाचा आहे, यामध्ये शिखर संस्थेने आपली सल्लागार सेवा सत्वर उपलब्ध करुन देण्याची अपेक्षा आहे. नागरी बँकांना सहभागातील कर्जे (कन्सोर्शियम लोन्स), खेळते भांडवलाच्या कर्जाचे मूल्यांकन, कर्ज वितरणापूर्वी व नंतर घ्यावयाची माहिती आणि सतर्कता, अत्यंत महत्त्वाचे असलेले अनुत्पादित कर्जाचे व्यवस्थापन, पारदर्शकता आणणेसाठी कॉर्पोरेट गव्हर्नन्स व सरतेशेवटी नागरी सहकारी बँकांमध्ये व्यावसायिकता वाढविणे आदी विषयांवर देखील NUCFDC चे तात्काळ मार्गदर्शन अपेक्षित आहे. या शिखर संस्थेचे एकमेव कार्यालय सध्या दिल्ली येथे असून नागरी सहकारी बँका मात्र देशातल्या विविध शहरी व ग्रामीण भागात दूरवर विखुरल्या आहेत. या बँकांपर्यंत NUCFDC ने सत्वर व सातत्याने पोहोचण्यासाठी शिखर संस्थेने क्षेत्रीय कार्यालये (रिजनल ऑफीसेस) उघडणे अपेक्षित आहे. इतरही अनेक अपेक्षा आहेत, त्यांची लवकरच पूर्तता व्हावी, हीच अपेक्षा!

*****